सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१०/४३०/४६५
ई-मेल-desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: १०/एडीएम/पदविका प्रवेश यादी/२०-२१/ १४९ दिनांक : 16 FEB 2021

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया ....

संदर्भ :- १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१९/(प्र.क्र.०६/१९)/तांशि-५ दि. ०६.०२.२०१९

२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. मान्यता-२०२०/प्र.क्र.३९/२०)/तांशि-५ दि. २२.०७.२०२०

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. ०६.०२.२०१९ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेशी संबंधित बाबींची अंमलबजावणी करण्याकरीता संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून 'सक्षम प्राधिकारी' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया संचालनालयामार्फत पूर्ण करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानीत, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था ,खाजगी विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश याद्या संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे वतीने तपासणी करण्यासाठी आपणास प्राधिकृत करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता आपल्या अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था, खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश यादीची तपासणी करून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या अंतिम मान्यतेकरिता आपल्या पडताळणी अहवालासह व शिफारशीसह या संचालनालयास दि.३१.०३.२०२१ पर्यंत सादर करण्यात याव्यात. आपल्या कार्यालयाकडून याद्या जस जशा तपासल्या जातील त्याप्रमाणे अंतिम मान्यतेसाठी संचालनालयाकडे सादर कराव्यात. <u>प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेचे अंतिम मान्यता प्रमाणपत्र संचालनालयाकडून प्राप्त करणे ही संस्थेची जबाबदारी असल्याचे संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे.</u>

प्रवेश यादी पडताळणी करताना खालील बाबींची पडताळणी करण्यात यावी.

१. प्रवेश यादी पडताळणीसाठी संचालनालयाच्या संकेतस्थळावरील संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीची प्रिंटआऊट घेऊन ती पडताळणीसाठी उपयोगात आणावी.

२. प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर करण्यात आलेल्या संस्थेस संबंधित सक्षम प्राधिकरणाची (AICTE/PCI) मान्यता असल्याचे कागदपत्र पडताळणी करण्यात यावेत.

३. नवीन संस्थांनी आवश्यक रकमेची नियत ठेव (F D) भरणा केली आहे किंवा नाही याची पडताळणी करावी, भरली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर प्रवेश यादी पडताळणीची कार्यवाही करावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये ज्या संस्थांना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचेकडून प्रवेशक्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यात आलेली आहे अशा संस्थांकडून शासनास भरणा करावयाचे नोंदणी शुल्काची आकारणी करण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार आपल्या विभागातील अशा संस्थांकडून नोंदणी शुल्क घेण्यात यावे. या अनुषंगिक बाबींची कार्यवाही करण्याची जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

४. संस्थास्तरावरील आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या जागांवरील (A CAP) प्रवेशाकरिता संबंधित संस्थेने संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली जाहिरात, अर्ज मागविण्यासाठी कालावधी, प्राप्त अर्जांची गुणवत्ता यादी, प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्तेनुसार प्रवेश केले आहेत इत्यादी बाबींची काळजीपूर्वक पडताळणी करण्यात यावी.

५. अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी / संस्थाप्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणीवेळी तपासावे. तसेच प्रवेशीत उमेदवारांच्या मुळ प्रमाणपत्रांची व कागदपत्रांची पुनश्च पडताळणी करावी.

६. सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश याद्या पडताळणी करताना प्रवेशित उमेदवारांची संबंधित अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक अर्हतेची विशेषत्वाने पडताळणी करणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने दिनांक २२.०७.२०२० रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने संचालनालयाने प्रसिद्ध केलेल्या तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केलेली अर्हता केवळ ग्राहय धरता येईल.

७. विभागीय कार्यालयांनी पडताळणी केलेल्या व न केलेल्या प्रवेशयादयांची (त्रुटी अहवालासहीत ) संस्थानिहाय माहिती तक्त्याच्या स्वरूपात संचालनालयास पाठविण्यात यावी जेणेकरून प्रलंबित राहिलेल्या संस्थांची यादी त्वरीत उपलब्ध होऊ शकेल.

८. संस्थेकडून प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर झाल्यानंतर शुल्क परताव्याबाबत आणि मूळ कागदपत्रे परताव्याबाबत संबंधित संस्थेबद्दल काही तक्रार असल्यास त्याबाबत चौकशी करुन अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा मात्र प्रवेश यादी प्रमाणित करण्याची कार्यवाही प्रलंबित ठेवण्यात येवू नये. तसेच शुल्क परतावा व मूळ कागदपत्रे परताव्याबाबत संस्थेकडे कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र सर्व संबंधित संस्थेच्या प्राचार्यांकडून घेण्यात यावे.

९. अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थांच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्यांक विकास विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याच्या वैध कालावधीची पडताळणी करण्यात यावी.

१०. पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेकरीता प्रसिद्ध करण्यात आलेल्या नियमावलीमध्ये उशिरा प्रवेश /प्रवेशित उमेदवारांची माहिती उशिरा अपलोड करणे,मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा

जास्त प्रवेश करणे अशी प्रकरणे नियमित करण्याची तरतूद नाही. ही बाब विचारात घेता विहीत मुदतीनंतर केलेले किंवा संचालनालयाच्या संकेतस्थळावर उशिरा अपलोड केलेले प्रवेश आणि मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त केलेले प्रवेश कोणत्याही सबबीवर मान्य करण्यात येऊ नयेत. असे प्रवेश रद्दबातल ठरविण्यात यावेत व तसे संचालनालयास कळविण्यात यावे.

११. संस्थेने विहीत दिनांकापर्यंत विभागीय कार्यालयात प्रवेश यादी सादर करणे आवश्यक असल्याचे आपल्या विभागातील सर्व संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावे.

१२. प्रवेश याद्या पडताळणीसाठी कागदपत्रे सादर न करणा-या संस्थांमधील उमेदवारांच्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्थाप्रमुख व्यक्तीश: जबाबदार राहतील ही बाब सर्व संस्थांच्या निदर्शनास लेखी स्वरुपात आणण्यात यावी.

१३. एखादया विशिष्ट प्रकरणी मा.सर्वोच्च वा मा.उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले असल्यास त्यानुसार ते प्रकरण तपासावे.

**प्रवेश यादी तपासणीची प्रक्रिया दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंत पूर्ण करुन याद्या अंतिम मान्यतेकरीता आपल्या शिफारशीसह या संचालनालयास सादर कराव्यात. अंतिम मान्यतेनंतरच विद्यार्थ्यांनी संस्थेत घेतलेले प्रवेश अधिकृत समजण्यात येतील याची सुचना आपल्या स्तरावरून सर्व संबंधित संस्थांना द्यावी.**

प्रवेश यादीची आपल्या स्तरावर तपासणी झाल्यानंतर त्यामध्ये नियमबाह्य प्रवेश अथवा अनियमितता झाल्याचे आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची व्यक्तीश: नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ यांना माहितीस्तव सादर.

२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सादर.